**<u>ठळक बातम्या</u>**

- इथेनॉलच्या खरेदीसाठीचे हमीदर केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजूर

- येत्या दोन वर्षात म्हाडाच्या माध्यमातून सुमारे एक लाख घरांची निर्मिती करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न

- प्रयागराजमध्ये कुंभमेळ्यात चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू, ६० जण जखमी

**आणि**

- कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातल्या पाच आरोपींना मुंबई उच्च न्यायालयाकडून जामीन

**<><><><><>**

ऊसापासून काढलेल्या इथेनॉलच्या खरेदीसाठीचे हमीदर केंद्रीय मंत्रीमंडळानं आजच्या बैठकीत मंजूर केले. त्यात सी दर्जाच्या मळीपासून काढलेल्या इथेनॉलकरता ५७ रुपये ९७ पैसे आणि बी दर्जाच्या मळीपासून काढलेल्या इथेनॉल करता ६० रुपये ७३ पैसे प्रति लीटर दर जाहीर झाला आहे. ऊसाचा रस, साखर आणि साखरेच्या सिरप पासून मिळणाऱ्या इथेनॉल करता ६५ रुपये ६१ पैसे प्रतिलीटर दर जाहीर झाला आहे. इंधनात इथेनॉल मिसळल्यानं एकलाख १३ हजार कोटी रुपये मूल्याच्या परदेशी चलनाची बचत होत असल्याचं, माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले.

राष्ट्रीय महत्त्वपूर्ण खनिज अभियानाला केंद्रसरकारने मंजुरी दिली आहे. या मोहिमेकरता ३४ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त तरतूद करण्यात आली आहे. प्रदूषण न करणारं हरित तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी या महत्त्वपूर्ण खनिजांचा अखंडित पुरवठा आवश्यक असून कृषी, संरक्षण, वाहतूक, अणु उर्जा,

इलेक्ट्रॉनिक्स, एअरोस्पेस अशा विविध क्षेत्रांना या निर्णयामुळे फायदा होणार आहे, असं वैष्णव म्हणाले. महत्त्वाच्या खनिजांची आयात कमी करुन देशांतर्गत उत्पादन वाढवण्यासाठी अधिक उत्खनन आणि खाणींचं अधिग्रहण करण्याच्या उद्देशानं हे अभियान सुरु केलं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन वर्षात म्हाडाच्या माध्यमातून सुमारे एक लाख घरांच्या उभारणीसाठी सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहेत, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितलं. म्हाडा पुणे मंडळातर्फे ३ हजार ६६२ सदनिकांच्या विक्रीसाठी संगणकीय सोडत काढताना ते बोलत होते.

या उद्दिष्टपूर्तीसाठी राज्याचं गृहनिर्माण धोरण लवकरच जाहीर केलं जाईल. या गृहनिर्माण धोरणानुसार सर्वसामान्य नागरिक, काम करणाऱ्या महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक यांच्यासाठी ठिकठिकाणी वसतिगृहं उभारली जातील, असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

महाराष्ट्राला दिलेलं धान्य वितरणाचं लक्ष्य वाढवून ८ कोटी २० लाख टन करण्याची विनंती राज्य सरकारनं केंद्राकडे केली आहे. गेल्या दशकात वाढलेल्या लोकसंख्येनुसार हे लक्ष्य वाढवून देण्याबाबत राज्य शासनानं २०२१ साली केंद्र सरकारला प्रस्ताव दिलेला आहे. त्याला मान्यता द्यावी, अशी विनंती अन्न, नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी आज केंद्रीय अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री प्रल्हाद जोशी यांची दिल्ली येथे भेट घेऊन केली.

अन्न धान्य वितरण प्रणाली सुरळित करणं, ऑनलाईन वितरण प्रणालीतल्या समस्या दूर करणं, शिधा पत्रिका व्यवस्थापन प्रणाली संपूर्णत: सुरळीत चालू ठेवणं, अन्न महामंडळाशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी केंद्रानं पुढाकार घ्यावा, अशी

विनंती मुंडे यांनी केला. या सर्व यंत्रणा आणि राज्य सरकार यांच्यात लवकरच बैठक घेऊन मार्ग काढण्याची ग्वाही प्रल्हाद जोशी यांनी दिली.

**<><><><><>**

मुंबई महानगर क्षेत्रातल्या प्रदुषणावर नियंत्रण आणण्यासाठी पेट्रोल आणि डिझेल वाहनांवर निर्बंध आणणे तसंच सीएनजी आणि इलेक्ट्रिक वाहनानांच परवानगी अशा बाबींचा अभ्यास करण्यासाठी समितीची स्थापना केली आहे. या सात सदस्यीय समितीत संबंधित विषयातल्या तज्ञांचा समावेश असेल. सेवानिवृत्त सनदी अधिकारी सुधीरकुमार श्रीवास्तव या समितीचे अध्यक्ष असतील.

**<><><><><>**

पुण्यात गुइलेन बॅरे सिंड्रोमची रुग्णसंख्या वाढल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं नेमलेल्या उच्चस्तरीय पथकानं आज पुण्यातल्या परिस्थितीचा आढावा घेतला. पथकानं ससून सर्वोपचार रुग्णालयाला भेट देऊन, रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांसोबत बैठक घेतली. केंद्रीय पथकानं आज सिंहगड रस्ता परिसरातल्या पाण्याचा स्त्रोतांची पाहणी केली.

पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनाकडून ‘जीबीएस’ बाधित भागांमध्ये तातडीनं रुग्ण सर्वेक्षण सुरू करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी नव्या अभ्यासक्रमांची गरज, राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी व्यक्त केली आहे. नांदेड इथल्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा दीक्षान्त सोहळा आज झाला त्यावेळी संबोधित करताना ते बोलत होते.

बी रघुनाथ आर्टस, कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयाची विद्यार्थीनी श्रद्धा हरहरे हिला नांदेड चान्सलर सुवर्ण पदकानं राज्यपालांच्या हस्ते सन्मानित

करण्यात आलं. तिला विद्यापीठात सर्वाधिक गुण मिळाले. इतर ५१ विद्यार्थ्यांना सुवर्णपदकानं तर १८० विद्यार्थ्यांना पीएच.डी अर्थात विद्यावाचस्पती पदवी प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आलं.

<><><><><>

अहिल्यानगर इथल्या महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर प्रशांतकुमार पाटील यांचं आज पहाटे आकस्मिक निधन झालं. डॉक्टर पाटील यांनी मुंबईच्या केंद्रीय कापूस तंत्रज्ञान संशोधन संस्थेच्या संचालक पदाची तसंच तंत्रज्ञान हस्तांकरण प्रमुखपदाची जबाबदारी सांभाळली होती.

<><><><><>

उत्तरप्रदेशामध्ये प्रयागराज इथं महाकुंभात आज मौनी अमावस्येनिमित्त आयोजित अमृत स्नानाच्या दरम्यान चेंगराचेंगरीत ३० जणांचा मृत्यू झाला आणि ६० जण जखमी झाले. महाकुंभचे पोलीस उप महानिरीक्षक वैभव कृष्णा यांनी वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. मध्यरात्री भाविकांची प्रचंड गर्दी असल्यामुळे गडबड झाली, बॅरिकेट्स तुटल्यामुळे रस्त्यावर झोपलेले भाविक इतर भाविकांच्या पायाखाली येऊन जखमी झाले असं कृष्णा यांनी सांगितलं. जखमी झालेल्या ९० जणांना रुग्णालयात नेण्यात आलं होतं, त्यातल्या तीस जणांचा मृत्यू झाला आहे. उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी सर्व आखाड्यांच्या महामंडलेश्वर आणि संतांशी चर्चा केली असून सर्व भाविकांची काळजी घेतली जात आहे, असंही त्यांनी सांगितलं.

प्रयागराज इथल्या महाकुंभात झालेली चेंगराचेंगरीची घटना दुर्दैवी असून त्यामध्ये जीवित हानी झालेल्या भाविकांच्या नातलगांप्रती शोक संवेदना व्यक्त करत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मृतांना आदरांजली वाहिली आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाकुंभ इथं झालेल्या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

कॉम्रेड गोविंद पानसरे हत्या प्रकरणातल्या पाच आरोपींना मुंबई उच्च न्यायालयानं जामीन मंजूर केला आहे. सचिन अंदुरे, गणेश मिस्कीन, अमित देगवेकर, भरत कुरणे आणि वासुदेव सूर्यवंशी या पाच आरोपींना 2018 ते 2019 दरम्यान अटक केल्यानंतर बराच काळ ते अटकेत आहेत, आणि तपासात लक्षणीय प्रगती न झाल्यामुळे खटला लवकर निकाली लागण्याची शक्यता नाही, त्यामुळे जामीन मंजूर करत असल्याचं न्यायमूर्ती ए. एस. किल्लोर यांच्या एकलपीठानं सांगितलं. याच प्रकरणातला आणखी एक आरोपी वीरेंद्र तावडे याच्या जामीन अर्जाचा स्वतंत्रपणे आढावा घेण्याचे निर्देश न्यायालयानं दिले आहेत.

**<><><><><>**

सांगली जिल्ह्यात जीबीएस आजाराचे संशयित ६ रुग्ण आहेत. त्यातला एक कोल्हापूर जिल्ह्यातला आहे अशी माहिती रुग्णालय प्रशासनानं दिली आहे.

**<><><><><>**

सायबर फसवणुकीसाठी बँक खातं पुरवणाऱ्या सहा जणांच्या टोळीला पिंपरी चिंचवड सायबर पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी झारखंड, गुजरात, ओदिशा या राज्यातील असून त्यांनी कंबोडियातील एकाला हजारो बँक खाती पुरवल्याचं उघड झालं आहे. एका गुन्ह्याच्या तपासात एक जणाला ताब्यात घेतलं असता तो बँक खातं पुरवण्याच्या प्रकारात सहभागी असल्याचं आढळून आलं. त्याची अधिक चौकशी केली असता या टोळीचा तपास लागला.

**<><><><><>**

अभिनेता सैफ अली खान याच्यावरच्या हल्ला प्रकरणातला आरोपी मोहम्मद शरिफुल इस्लाम शहजाद याला न्यायालयानं १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी दिली आहे. त्याची पोलीस कोठडी आज संपल्यावर त्याला आज न्यायालयापुढे हजर करण्यात आलं. त्याच्याकडून एक चाकू जप्त केला असून तो न्यायवैद्यक तपासणीसाठी पाठवल्याची, तसंच हल्ला करण्यापूर्वी त्यानं सैफ अली खान याच्या घराची रेकी केल्याची माहिती पोलिसांनी सुनावणीदरम्यान दिली.

<><><><><>

धुळे महापालिकेच्या कर वसुली पथकानं आज दुपारी शहरातल्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या इमारतीवर जप्तीची कारवाई केली. ही जागा राजवाडे संशोधन मंडळाच्या मालकीची असून सुमारे ८५ लाख रुपये मालमत्ता कर थकल्यामुळे ही कारवाई करण्यात आली.

//<><><><><>//